जा. क्र. प्रा/प्राशि/मान्यता/पीआर/
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ याचे
कार्यालय. दिनांक:- / /१९९०.

8 AUG 1990

प्रति,

शिक्षणाधिकारी [प्राथमिक विभाग.]
जिल्हा परिषद, पुणे

विषय:- सन १९९०-९१ या शैक्षणिक वर्षात नवीन
खाजगी प्राथ. शाळांना परवानगी देणे बाबत.

संदर्भ :- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग
क्र. व्हीएलएस १०९०/प्राशि ३१.५२८९
दिनांक.. ११ जुलै ९० चे पत्र.

उपरोक्त विषया संबधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केले शासनाकडील संदर्भाधीन पत्र कृपया अवलोकन करावे.

या बाबत कळविण्यात येते की, खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्या बाबत शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदी ला अपवाद करुन खाली नमुद केलेल्या संस्थेला तीच्या नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातुन जून १९९० पासून इयता १ ली ते सन १९९०-९१ या शैक्षणिक वर्षात प्रत्येक्ष सुरु असलेल्या वर्गासह ... प्राथमिक शाळा सुरु करण्यास खाली नमुद केलेल्या अटीची पूर्तता करण्याचा शर्ती वर विनाअनुदान ततवार "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचेनांव | शाळेचे नावं व ठिकाण | इयत्ता. | माध्यम. |
|---|---|---|---|
| १) यशवंतराव चव्हाण शिक्षण प्रसारक मंडळ पिंपळेनिलख विशाल नगर पुणे २७ | पिंपळे निलख | इ. १ ली ते १९९०-९१ या शै. वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह | मराठी इंग्रजी |
| २) —॥— | —॥— | —॥— | |

१. संस्था सदर शाळा विनाअनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिक दृष्टया सक्षम असली पाहीजे.

२. संस्थेने शाळेसाठी शासनाने विहित केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मध्ये विहित केलेल्या अटीनुसार जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधाचे सोय केली पाहीजे तसेच शाळेसाठी विहित केलेल्या नियमानुसार विहित वयोमर्यादित व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमला पाहिजे व त्यांना शासनाने विहित केलेल्या दरानेच वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

[पान २ वर]